# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०८ जुलै, २०२६ / आषाढ १७, १९४८ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, दिव्यांग कल्याण, अपारंपारिक ऊर्जा मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

-----------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - १८**

-----------------------------------------------

### राज्यातील रुग्णालयांतील शवविच्छेदक संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) * ९५७२ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.अरुण लाड, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये गृह विभागाच्या अखत्यारीतील तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांच्या शवविच्छेदन केंद्रामध्ये प्रत्येक वर्षी आठ ते दहा हजार शवविच्छेदन प्रक्रिया केल्या जातात, मात्र सदर काम करण्यासाठी शवविच्छेदक संवर्गातील अपुरा कर्मचारीवृंद कार्यरत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सेंट जॉर्जेस व इतर अन्य रुग्णालयांत अत्याधुनिक शवविच्छेदन केंद्र बांधले असून, या रुग्णालयांमध्ये शवविच्छेदक कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे काही ठिकाणी शवविच्छेदन केंद्र सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या रुग्णालयांमध्ये शवविच्छेदन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शवविच्छेदकांच्या पुरेशा जागा भरून शवविच्छेदन केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यरत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईमध्ये राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका रुग्णालयातील व गृह विभागाच्या अखत्यारीतील शवविच्छेदन केंद्रामध्ये वर्षाला अंदाजे आठ ते दहा हजार शवविच्छेदन प्रक्रिया केल्या जातात, हे खरे आहे.

शवविच्छेदन सुविधा उपलब्ध असलेल्या रुग्णालयामध्ये शवविच्छेदक व शवविच्छेदक सेवक यांची ९३ पदे मंजूर असून त्यापैकी ५५ पदे कार्यरत आहेत. संबंधित यंत्रणांकडुन प्राप्त अहवालानुसार रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

शवविच्छेदन प्रक्रिया सुरळीत चालु राहण्यासाठी तसेच वर्ग-४ संवर्गातील बहुउद्देशीय कर्मचारी यांना प्रशिक्षीत करुन त्यांच्या सेवा शवविच्छेदनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन कंत्राटी स्वरुपातदेखील पदे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबईतील शवविच्छेदन सुविधा उपलब्ध असलेल्या सर्व रुग्णालयात नियमीत पदे तसेच वर्ग ४ संवर्गातील बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन शवविच्छेदन गृहे पूर्ण क्षमतेने सुरु ठेवण्यात आलेली आहेत.

तसेच वैद्यकीय शिक्षण विभाग व गृह विभागांतर्गत शवविच्छेदन केंद्रासाठी आकृतिबंध सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू व जव्हार (जि.पालघर) आगाराकरिता सुस्थितीत असलेल्या बसेस उपलब्ध करून देण्याबाबत

**(२) * ९२७७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू व जव्हार (जि.पालघर) आगारातून ग्रामीण व दुर्गम भागात बससेवा उपलब्ध करून देण्यात येत असून, सदर बसेसची दुरवस्था झाली असून त्यामध्ये वारंवार तांत्रिक बिघाड होत असून, प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डहाणू व जव्हार आगारातून लांब पल्ल्याच्या बससेवा सुरू करण्यात आल्या असल्या तरी अद्यापही प्रवाशांच्या सेवेसाठी जुन्या बसेस वापरण्यात येत असल्याने तसेच दिनांक ९ एप्रिल, २०२६ रोजी बस रस्त्यातच बंद पडल्यामुळे प्रवाशांची गैरसोय झाल्याचे तसेच काही दिवसांपूर्वी धावत्या एसटी बसचे छत उडून गेल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षितता धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी नवीन व सुस्थितीतील बसेस उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी वारंवार करूनही डहाणू व जव्हार आगारास अद्याप पुरेशा प्रमाणात नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दखल घेऊन डहाणू व जव्हार आगारातील प्रवाशांना सुरक्षित, सुस्थितीत व अत्याधुनिक बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) दिनांक ०९/०४/२०२६ रोजी डहाणू आगाराची बोर्डी- क्रंकाडी या मार्गावर धावत असताना वाहनाचा एअर कॉम्प्रेसर अचानक निकामी झाल्यामुळे मार्गस्थ बिघाड झाली होती. सदर घटनेनंतर कर्तव्यावरील चालक व वाहक यांनी तात्काळ आवश्यक कार्यवाही करून मागून येणाऱ्या बसमध्ये प्रवाशांची व्यवस्था केली होती.

पालघर आगाराची शिवशाही बस पालघर-स्वारगेट या नियतावर धावत असताना वाहनाच्या छतावरील संकटकाळी बाहेर पडण्यासाठी असणारी छोटीशी झडप (रुफ हॅच) ही हवेच्या दाबामुळे उडून गेल्याची घटना घडलेली आहे. रा.प.वाहनांमध्ये दोष आढळून आल्यास, त्याची त्वरीत दुरुस्ती करण्यात येते.

(३), (४) व (५) डहाणू व जव्हार आगाराकरीता प्रत्येकी १० बीएस-६ मानकाची नवीन वाहने देण्यात आलेली आहेत. डहाणू व जव्हार आगारात वाहनांची नियमित दैनिक देखभाल, दशदिनी देखभाल व डेपो डॉकिंग आगार कार्यशाळेत केले जाते व वाहने सुस्थितीत ठेवण्यात येतात.

-----------------

## राज्यातील बस अपघातांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(३) * ९६८९ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसचे माहे एप्रिल, २०२४ ते जानेवारी, २०२६ या कालावधीत ७ हजार अपघात होऊन त्यामध्ये ८१५ प्रवाशांचा मृत्यू झाले असल्याचे तसेच सदर अपघातांमध्ये अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले असून, उक्त अपघात हे चालकांची चूक, वाहनांची दुरवस्था व रस्त्यांची दुरवस्था यामुळे झाल्या असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरमान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने किती प्रकरणांमध्ये संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली,

(३) असल्यास, भविष्यात राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या अपघातांना प्रतिबंध घालण्यासाठी बसचे आधुनिकीकरण, चालकांचे प्रशिक्षण, नियमित वाहन तपासणी व रस्ते सुरक्षा उपाययोजना मजबूत करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) रा.प बसेसच्या प्रत्येक अपघाताची चौकशी करण्यात येते चौकशीअंती अपघातास रा.प.बस चालक जबाबदार असल्यास संबंधित चालकांवर खातेनिहाय प्रमादीय कारवाई करण्यात येते तसेच पोलीस खात्यामार्फत देखील अपघातांची चौकशी करुन, त्यानुसार जबाबदार संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येते.

तसेच माहे एप्रिल, २०२४ ते जानेवारी, २०२६ या काळात रा.प.बस जबाबदार असलेल्या अपघातांची संख्या ४२८१ इतकी असून जबाबदार चालकांवर रा.प.खातेनिहाय प्रमादीय कारवाई करण्यात आली आहे.

(३) व (४) रा.प.महामंडळाच्या वाहन ताफयात आधुनिक तंत्रज्ञानयुक्त प्रकारातील साध्या बसेस व पर्यावरण पुरक ई-बसेसचा समावेश करण्यात येत आहे. बसेसच्या रा.प.बसेसचे अपघातांना आळा घालण्यासाठी महामंडळाकडुन नियमितपणे अपघात नियंत्रण उपाययोजना करण्यात येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने चालकांचे सेवापुर्व प्रशिक्षण, अपघात प्रवण चालकांचे प्रशिक्षण, चालकांचे व यांत्रिक कर्मचारी यांचे प्रबोधन, चालकांची वैदयकीय तपासणी तसेच चालकांना अपघात विरहीत सेवेकरीता प्रोत्साहन मिळावे या हेतुने विविध बक्षीस योजना राबाविण्यात येत आहेत.

DB Skills & Livelihood या संस्थेमार्फत सफर सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण देण्यात येते.

तसेच रा.प.वाहनांची स्थिती उत्तम राहण्याकरीता विभागीय कार्यशाळेमध्ये आरटीओ पासिंग, आरटीओ प्रकारची कामे, पुन:स्थितीकरण हे वाहन देखभालीचे नियतकालीन कार्यक्रम वाहनांचा ताफा सुस्थितीत ठेवण्यात येतो.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसेस इलेक्ट्रीक करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(४) * ८९१२ श्री.श्रीकांत भारतीय, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी व इंधन खर्चात बचत करण्याच्या उद्देशाने राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसगाड्या सन २०३५ पर्यंत इलेक्ट्रीक करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या इलेक्ट्रीक बसेस पासून नफा होण्याच्या दृष्टीने महामंडळाला सवलती (अनुदान, वीजदर सवलत, ऑपरेशनल मॉडेल) देण्याबाबत शासनाकडून अद्याप कोणतीच ठोस उपाययोजना करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इलेक्ट्रीक बसेसकरीता आवश्यक चार्जिंग स्टेशनची संख्या अपुरी असून, ग्रामीण व दुर्गम भागात इलेक्ट्रीक वाहन चालविताना अडचणी येत असून व चार्जिंग करीता आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळास आर्थिक संकटातुन बाहेर काढण्याकरीता प्रवासी संख्या वाढविणे, बसेसच्या मार्गांची पुनर्रचना करणे तसेच व्यवस्थापन व तिकिटाकरीता डिजिटल प्रणाली राबवून खाजगी बस वाहनांमार्फत होत असलेली स्पर्धा कमी करण्याकरिता व दिर्घकालीन आर्थिक भार कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) महाराष्ट्र शासनामार्फत रा.प. महामंडळास ई-वाहन धोरण सन २०२१ अंतर्गत ६४८ इलेक्ट्रीक बसेसकरीता सुमारे रुपये ९८.१८ कोटी इतके अनुदान देण्यात आले आहे.

(३) रा.प. महामंडळात फेम २ योजनेंतर्गत १५० ई-बसेस व ५१५० ई-बस प्रकल्पांतर्गत ९०७ बसेस चालनात आहेत. ५१५० ई-बस प्रकल्पांतर्गत ३९ ठिकाणी चार्जिंग स्टेशन्स कार्यान्वित आहेत. सदर ३९ चार्जिंग स्टेशन ९०७ बसेसकरीता पुरेसे आहेत.

(४) व (५) रा.प. महामंडळामार्फत मार्गांचे सुसूत्रिकरण करणे, ईबसेसच्या फेऱ्या संगणकीय आरक्षणाला उपलब्ध करुन देणे, युपीआय पेमेंटद्वारे प्रवाशांना तिकीट देणे, मोबाईल ॲपची सुविधा, कमी उत्पन्न येणाऱ्या फेऱ्यांची वेळ व मार्गांत आवश्यक बदल करणे तसेच फेऱ्यांचा दैनंदिन आढावा घेऊन प्रवाशी संख्या वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच रा.प. बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खाजगी प्रवाशी वाहतूक करणाऱ्या वाहनांना अटकाव करण्यात येत आहे. अवैध प्रवाशी वाहतूकीस आळा घालण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभाग व रा.प. महामंडळामार्फत संयुक्त तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

-----------------

**पुणे शहरातील गंगाधाम परिसरातील क्लोरीन गॅस गळतीच्या घटनेची चौकशी करण्याबाबत**

**(५) * ८९७० श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाधाम (जि.पुणे) परिसरात मध्यरात्री क्लोरीन गॅस गळती झाल्याने २६ जणांना श्वासोच्छवासाचा त्रास होऊ लागल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंलेडर सुरक्षित ठिकाणी न ठेवल्याने/ त्याबाबत योग्य ती काळजी न घेतल्याने क्लोरीन गॅसची सिलिंडरमधून गळती होऊन विषारी वायू हवेत पसरला असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनेची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

पोलीस उपायुक्त, पुणे शहर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधीन परिसरात क्लोरीन गॅस गळतीमुळे गोडावूनमधील कामगार व परिसरातील नागरिकांना श्वसनाचा त्रास होऊन जीवितास धोका निर्माण झाल्याच्या गुन्हा त्यांचे कार्यालयास नोंद झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) पोलीस उपायुक्त, पुणे शहर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, स्थानिक पोलीस प्रशासनाने दिनांक ३०/०४/२०२६ रोजी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम ३५(३) अन्वये संबंधितांना नोटिस देण्यात आली आहे.

पुणे महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार, पुणे महानगरपालिका, अग्नीशमन व आपत्कालीन विभागाने प्रश्नाधीन परिसरातील वायू गळती नियंत्रण, परिसरातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे व बाधित नागरिकांना वैद्यकिय उपचारासाठी पाठविणे या आवश्यक आपत्कालीन उपाययोजना केल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रश्नाधिन घटनास्थळाची पाहणी केली. पाहणीदरम्याण क्लोरिन गॅसचे सिलेंडर साठवणूक केल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील कृषी साहित्य खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६)** * **९७६४ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील ‘जिल्हा खनिज प्रतिष्ठान’ (DMF) अंतर्गत शेतकरी कल्याणाकरीता कृषी विभागाने प्रशासनाकडे सादर केलेले २० कोटी रुपयांचे मागणीपत्र बनावट व त्यावरील स्वाक्षऱ्यादेखील बनावट असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एटापल्ली तालुक्यातील ‘जीवनगट्टा’ येथील जनबंधू शेतकरी उत्पादक कंपनीच्या नावाने मोहफूल संकलन जाळी, सौर ऊर्जा कुंपण आणि जैविक कीडरोग व्यवस्थापन, कृषी अवजारे खरेदीसाठी सदर निधीची मागणी करण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांनी प्रशासनाकडे अशा कोणत्याही निधीची मागणी व सदर मागणीपत्रावर स्वाक्षऱ्या केल्या नसल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निधीमधून ७.८० कोटी रुपयांचे सौर कुंपण आणि साहित्य खरेदी प्रस्तावित करून शासनाची दिशाभूल केली असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने आर्थिक गैरव्यवहार व बनावट स्वाक्षऱ्यांद्वारे शासनाची फसवणूक करणाऱ्या कृषी विभागातील दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

(२) 'जिल्हा खनिज प्रतिष्ठान' निधी अंतर्गत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे मोहफूल संकलन जाळी, सौर ऊर्जा कुंपण व कृषी औजारे या घटकांच्या अनुदानासाठी प्रस्ताव सादर केला आहे. मात्र, सदर मागणी कोणत्याही विशिष्ट कंपनीच्या नावाने केलेली नाही.

(३) संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांनी बनावट अनुदान मागणी पत्राबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, गडचिरोली यांच्या कार्यालयाकडे पत्रव्यवहार केलेला नाही.

(४) हे खरे नाही. यापूर्वी जिल्हा खनिज प्रतिष्ठान योजनेतुन सौर कुंपण योजनेसाठी प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून रुपये १ कोटी ९८ लाख थेट लाभ हस्तांतरण तत्त्वावर गट व कंपन्यांच्या बँक खात्यात अनुदान स्वरुपात अदा केले आहेत.

(५) लागू नाही.

(६) लागू नाही.

-----------------

## लातूर जिल्हा पोलीस दलातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जास्तीची रक्कम जमा झाल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(७)** * **९८०३ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर येथील पोलीस दलामध्ये कार्यरत असलेल्या काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये सन २०१५ ते २०२५ या कालावधीत सुमारे २ कोटी ३८ लाख रुपयांहून अधिक रक्कम जमा झाल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी एका महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या बँक खात्यामध्ये अचानक मोठी रक्कम जमा झाल्याने सदर महिलेने यासबंधी तक्रार दाखल केली असता चौकशी दरम्यान आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पोलीस अधीक्षक, लातूर कार्यालयात मे, २०१५ ते जानेवारी, २०२५ या कालावधीत झालेला वेतन गैरव्यवहार, पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड यांच्या सन २०२४-२५ मधील वार्षिक तपासणीत जानेवारी, २०२५ मध्ये उघडकीस आला.

सदर प्रकरणी कागदपत्रांची पडताळणी व चौकशी करुन, अहवाल सादर करण्याकरीता उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, उदगीर, जि.लातूर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली.

सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार यातील ४ आरोपी (२ वरिष्ठश्रेणी लिपिक, १ कनिष्ठश्रेणी लिपिक व १ श्रेणी पोलीस उपनिरीक्षक) यांनी ३६८ कर्मचाऱ्यांच्या वेतनातील Employee Pay Drawn Report मध्ये INCENTIVE BDDS, Spl. Pay, Ref.Allowance, Training Allowance व Other Allowance या वेतन शीर्षांखाली मासिक वेतनामध्ये जास्तीची रक्कम दिली. मासिक वेतनामध्ये जास्तीची रक्कम अदा केल्याच्या बदल्यात आरोपींनी रोख स्वरुपात व डिजीटल पेमेंटद्वारे एकूण रुपये २,३८,९२,००७/- इतकी रक्कम बँक खात्यावर स्वीकारली आहे.

सदर प्रकरणी चौकशी करुन यातील दोषींविरुध्द पोलीस स्टेशन, शिवाजी नगर येथे गु.र.क्र.१९८/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३(५), ३१६(४), ३१८(४), ३१६(५), ३३६(२), ३३६(३), ३३८ व ३४० (२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी जास्तीची रक्कम अदा करण्यात आलेल्या पोलीस कर्मचारी यांच्या वेतनातून सदरची रक्कम कपात करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच ज्या लेखा अधिकारी व कर्मचारी यांनी पर्यवेक्षणात चुका केल्या आहेत त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्य मार्ग परिवहन महामंडळातील १७ अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(८) * ९९९२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महाव्यवस्थापक, विभाग नियंत्रक व आजी-माजी अधिकारी अशा एकूण १७ अधिकाऱ्यांच्या विरोधात चौकशी करण्यासाठी पाच सदस्यीय चौकशी समिती गठित केली असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधितांवर गंभीर आरोप होवूनही अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसून महामंडळाच्या ३१ विभागांपैकी ६ विभागातील नियंत्रकांवरील गैरव्यवहाराबाबतचा अहवाल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनास सादर केला असून त्यातही गंभीर स्वरुपाची निरिक्षणे नोंदविण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालामध्ये तसेच महामंडळातील महाव्यवस्थापक, विभाग नियंत्रकासह एकूण १७ अधिकाऱ्यांच्या विरोधातील चौकशी मध्ये तसेच राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ३१ विभागांपैकी ६ विभागातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सादर केलेल्या नियंत्रकांवरील गैरव्यवहाराचा अहवालामध्ये दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) नाही.

(३) व (४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत अद्याप अहवाल प्राप्त नाही.

-----------------

**बोदवड (जि. जळगाव) येथील तरूणाच्या मृत्युप्रकरणी आरोपींवर कारवाई करण्याबाबत**

**(९) * १०१९८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड (जि.जळगाव) येथील हनुमान नगर परिसरात राहणाऱ्या युवकाचा मारहाणी दरम्यान मृत्यू झाला असल्याची बाब दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषी आरोपी फरार असल्याने बोदवड व मुक्ताईनगर तालुक्यांतील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष पसरला असून या विरोधात तहसिल कार्यालयावर मोर्चे काढण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ११/०३/२०२६ रोजी रात्री मयत सुनील दैवे यांच्या घरासमोर प्रस्तुत गुन्ह्यातील आरोपी हे आरडाओरड करत असल्याने त्याबाबत सुनील दैवे यांनी आरोपी यांना जाब विचारला असता, जाब विचारल्याचा राग आल्याने आरोपी यांनी सुनिल दैवे या युवकास मारहाण केली. सदर प्रकरणी फिर्यादीवरुन दिनांक १६/०३/२०२६ रोजी बोदवड पोलीस स्टेशन येथे CCTNS No. ३९/२०२६ भा.न्या.सं. २०२३ कलम ११०, १८९(२), १९० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तद्नंतर, जखमी सुनिल दैवे यांच्यावर जळगांव येथे उपचार सुरु असताना दिनांक १९/०३/२०२६ रोजी त्यांचा मृत्यू झाला असल्याने सदरच्या गुन्ह्यात भा.न्या.सं. कलम १०५ हे वाढीव कलम समाविष्ट करण्यात आले आहे.

(२) सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्याकामी दिनांक २३/०३/२०२६ रोजी तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

तथापि, त्यापुर्वीच सदरच्या गुन्ह्यातील ५ आरोपींपैकी ३ आरोपींना अटक करण्यात आली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच एका आरोपीस मा.न्यायालयाने अटकपुर्व जामिन मंजूर केला आहे व उर्वीरित एक आरोपी (विधी संघर्ष बालक) यांस दिनांक ०१/०६/२०२६ रोजी ताब्यात घेवून बालसुधारगृह जळगाव येथे ठेवण्यात आले होते, त्यास मा.न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीत आरोपींनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने उक्तप्रमाणे गुन्हा दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

तसेच आरोपींविरुध्द सबळ पुरावे गोळा करुन दिनांक ११/०६/२०२६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नेरूर तर्फे हवेली (ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग) येथे श्री देव कलेश्वर देवस्थानाच्या जमिनीवरील अनधिकृत बांधकामाची चौकशी करण्याबाबत**

**(१०)** * **१०४४५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नेरूर तर्फे हवेली (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील सर्व्हे नं. १२६/३४ व १२६/३५ या मिळकतीवर 'श्री देव कलेश्वर वहिवाटदार देवस्थान सुप्रिटेंडंट पेठा कुडाळ' व इतर अधिकारात 'शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांची नोंद सातबारा उताऱ्यावर आहे, मात्र मूळ जमीन मालक (पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती, कोल्हापूर) यांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता सदर जागेत मालमत्ता क्रमांक ३१५४ चे अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ १०० रुपयांच्या संमतीपत्राच्या आधारे ही मालमत्ता तिऱ्हाईत व्यक्तींना परस्पर हस्तांतरित केल्याप्रकरणी श्री.मुरलीधर केशव मतकरी यांनी दिनांक ०८ नोव्हेंबर २०२५, १८ डिसेंबर २०२५ आणि २३ जानेवारी, २०२६ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, विभागीय आयुक्त (कोकण विभाग) तसेच जिल्हाधिकारी (सिंधुदुर्ग व कोल्हापूर) यांचेकडे लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमीन पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या अखत्यारीत येत असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमानुसार जमिनीचे हस्तांतरण किंवा बांधकाम करण्यासाठी सक्षम धर्मादाय आयुक्त किंवा पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती कोल्हापूर यांची रीतसर परवानगी अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देवस्थानची मालमत्ता केवळ १०० रुपयांच्या साध्या संमतीपत्रावर हस्तांतरित करून अनधिकृत बांधकाम करणे हा गंभीर कायदेशीर गुन्हा असल्याने, या गैरकारभाराची चौकशी करून सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत तसेच या प्रकरणात गुंतलेल्या संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) याबाबत सचिव, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांचे समोर सदर प्रकरणी सुनावणी घेण्यात आलेली असून सदर सुनावणी चा आदेश दिनांक ११/०२/२०२६ रोजी पारित केला आहे. त्यानुसार गट नं.१२६/३४ व १२६/३५ मधील श्री.कलेश्वर देवस्थान स्थानिक सल्लागार उप-समिती मार्फत झालेल्या बांधकामा विषयी चौकशी अधिकारी म्हणून समिती प्रशासनाकडील उप-अभियंता यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील पंचगंगा नदीच्या प्रदुषणात वाढ झाल्याबाबत

**(११) * १०४६६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील पंचगंगा नदीतील पाण्याच्या प्रदुषणात वाढ झाली असून त्यामध्ये अनेक ठिकाणी जलपर्णी वाढली असल्याचे कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आणि नदीकाठावरील गावांचे सांडपाणी, तसेच औद्योगिक वसाहतींतील रसायनमिश्रित पाणी नदीमध्ये सोडण्यात येत असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) उभारले असूनही सर्व सांडपाण्यावर पूर्ण प्रक्रिया केली जात नसल्याने नदीचे पाणी काळे आणि दुर्गंधीयुक्त झाल्यामुळे नदीकाठच्या गावांसह कोल्हापूर व इचलकरंजी शहरांतील नागरीकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने नदीतील जलपर्णी काढून तसेच पाण्याचे जलशुध्दीकरण करुन नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आणि प्रदूषणास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आणि नदीकाठावरील गावांचे घरगुती सांडपाणी पंचगंगा नदीमध्ये मिसळल्याने जलपर्णी वाढल्याची बाब माहे मार्च-एप्रिल, २०२६ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आली होती. तथापि, माहे

मार्च-एप्रिल-मे, २०२६ या दरम्यान औद्योगिक वसाहती मधून पंचगंगा नदीमध्ये रसायन मिश्रित सांडपाणी सोडत असल्याबाबत कोणतीही तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेली नसून अशा प्रकारची घटना घडल्याचे निदर्शनास आले नसल्याबाबत कळविण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

• सद्य:स्थितीत पंचगंगा नदी खोऱ्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमधून एकूण २१४.१९ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या घरगुती सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यापैकी १४४.७ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते व उर्वरित ६९.५९ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतके घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया पंचगंगा नदीत मिसळते.

• जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका व आरोग्य अधिकारी, इचलकरंजी महानगरपालिका यांचे अहवालानुसार पंचगंगा नदी प्रदूषणामुळे त्यांचे कार्यक्षेत्रात कोणत्याही जलजन्य आजार पसरले नसल्याचे कळविण्यात आले आहे.

(३) कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतून सद्य:स्थितीत एकूण १४९.१ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यापैकी ४२.४ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतके सांडपाणी विनाप्रक्रिया पंचगंगा नदीत मिसळते. सदर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता एकूण ४९.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतून निर्माण होणाऱ्या ४० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या घरगुती सांडपाण्यापैकी सद्य:स्थितीत ३८ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते उर्वरित सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता व भविष्यातील लोकसंख्या वाढ विचारात घेता एकूण ३२.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

• पंचगंगा नदी खोऱ्यातील शिरोळ नगरपरिषद, कुरुंदवाड नगरपरिषद, हुपरी नगरपरिषद व हातकणंगले नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निर्माण होणाऱ्या ५.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या घरगूती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता स्वच्छ भारत मिशन २.० या योजनेतून सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविण्याचे प्रस्तावित आहे.

• स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल जनहित याचिका क्र.१८३/२०१२ या न्यायालयीन प्रकरणी मा.न्यायालयाच्या आदेशांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात येवून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत.

• पंचगंगा नदी खोऱ्यामध्ये उपरोक्त साखर कारखाने, आसवणी व इतर डेअरी, कापड उद्योग यामधून अंदाजे १८.३ दललि प्रतिदिन इतके सांडपाणी निर्माण होते. सर्व उद्योगांनी निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी स्वत:ची सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारली असून ती कार्यरत असते. इचलकरंजी शहर व परिसरातील वस्त्र उद्योगांसाठी संयुक्त सांडपाणी प्रकिया संयंत्रणा कार्यान्वित आहे.

• महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संपादन क्षेत्राबाहेरील हातकणंगले परिसरातील इचलकरंजी सहकारी औद्योगिक वसाहत, जि.कोल्हापूर, लक्ष्मी सहकारी औद्योगिक वसाहत, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या सहकारी औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची सुधारणा, उन्नतीकरण

व क्षमता वाढ करणे व पार्वती सहकारी औद्योगिक वसाहत, यड्राव, जि.कोल्हापूर येथे नवीन सी.ई.टि.पी. बांधण्याकरीता उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.आयडीसी-२०२४/प्र.क्र.२४९/उद्योग-१४, दिनांक ३०/०९/२०२४ नुसार एकूण १२ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या तीन सीईटीपींकरीता एकूण रक्कम रुपये ६०९.५८ कोटी इतक्या रकमेस मान्यता देण्यात आली आहे.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राज्यातील उद्योगांना प्रक्रियाकृत अथवा अप्रक्रियाकृत सांडपाणी नदीमध्ये सोडण्याची परवानगी देण्यात येत नाही. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रदूषणकारी उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन सांडपाण्याची गुणवत्ता तपासली जाते. प्रदूषणाचे प्रमाण मानकांपेक्षा जास्त आढळल्यास दोषी उद्योगांवर जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ नुसार कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेरुळ (नवी मुंबई) येथील पाणथळ व कांदळवनाच्या भागात विकासकाने अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(१२) * १०५२८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ (नवी मुंबई) येथील सेक्टर-६० मधील पाणथळ व कांदळवनांनी वेढलेल्या भागात विकासकाकडून पर्यावरणविषयक आवश्यक वैधानिक परवानग्या न घेता बांधकाम प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची संबंधित सक्षम प्राधिकरणामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे तसेच संबंधित प्रकल्पासाठी पर्यावरणीय मंजुरी, किनारी नियमन क्षेत्र (CRZ) मंजुरी करीता कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, पाणथळ क्षेत्रे व कांदळवनांचे संरक्षण करण्यासाठी आणि संवेदनशील पर्यावरणीय क्षेत्रांमध्ये अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित विकासक व संस्था यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

नवी मुंबईतील पाम बीच मार्गावर नेरुळ, सेक्टर ६० “ येथील में मिस्त्री कन्स्ट्रक्शन कंपनीचा गोल्फ कोर्स व रिअल इस्टेट प्रकल्प, सिआरझेड शिफारशीसाठी, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटी (एमसीझेडएमए) च्या ११७ व्या व ११८व्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला होता.सदर बैठकीतील निर्णयानुसार, एमसीझेडएमए कडून दिनांक ११/१/२०१८ व दिनांक १२/३/२०१८ अन्वये सिआरझेड अधिसूचना, १९९१ अंतर्गत मंजूर किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (CZMP) नूसार, प्रकल्पास सिआरझेड शिफारस देण्यात आली होती. सदर शिफारशीनुसार पॉकेट “ए” व “बी” चा काही भाग सिआरझेड II मध्ये व काही भाग सिआरझेड क्षेत्राबाहेर होता.सदर सिआरझेड क्षेत्राबाहेरील जागेवर

गोल्फ कोर्सला सिआरझेड शिफारस देण्यात आली होती. तसेच, पॉकेट डी व ई हे सिआरझेड क्षेत्राबाहेर असून त्या जागेवर निवासी व व्यवसायिक विकास प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला होता.

तसेच, पॉकेट डी व ई मधील निवासी व व्यवसायिक विकास प्रकल्पास राज्य पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरणाकडून (State Environment Impact Assessment Authority) दिनांक ४/१२/२०१९ व दिनांक २७/१२/२०२३ अन्वये पर्यावरण मंजूरी (Environment clearance) देण्यात आली आहे.

केंद्र शासनाने दिनांक १८ जानेवारी, २०१९ रोजी नवीन सिआरझेड अधिसूचना जाहीर केली आहे. सदर सिआरझेड अधिसूचना, २०१९ च्या अनुषंगाने, मे. मिस्त्री कंन्स्ट्रक्शन कंपनीने पॉकेट डी व ई सुधारीत बांधकामाचा प्रस्ताव सादर केला होता.सदर प्रस्ताव हा एमसीझेडएमए च्या विविध बैठकीत विचारार्थ घेण्यात आला होता.त्यानुषंगाने, एमसीझेडएमए च्या दिनांक २१/५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये, पॉकेट डी व ई मधील प्रस्तावित बांधकाम (टॉवर २ ते ८) हे मंजूर सिझेडएमपी, २०१९ नूसार सिआरझेड क्षेत्राबाहेर असून, त्यावर सिआरझेड अधिसूचना, २०१९ च्या तरतुदी लागू नसल्याचे कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रशासकीय कामांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या निर्णयाबाबत

**(१३) * १०२३४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **माहिती तंत्रज्ञान मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रशासकीय कामांत अधिक गतिमानता आणण्यासाठी आणि सेवा वितरण सुधारण्यासाठी राज्य सरकारने कृत्रिम बुध्दीमत्तेचा (AI) वापर करण्यावर भर देण्याचे निश्चित केले असून, यानुसार प्रत्येक शासकीय विभागाला किमान एक 'एआय प्रकल्प' राबविणे बंधनकारक करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरी सेवा वितरण, तक्रार निवारण, निरीक्षण व अनुपालन (Compliance), निर्णय सहाय्य आणि नोंदींच्या डिजिटल व्यवस्थापनासाठी सदर 'एआय' प्रणालीचा वापर करण्याची सूचना शासनाने सर्व विभागांना केली असून शासकीय विभागांमध्ये अशा प्रकारे एआय प्रकल्प राबविल्यामुळे ठराविक संवर्गातील पदांवर व मनुष्यबळावर त्याचा परिणाम होणार असल्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांना बदलत्या तंत्रज्ञानानुसार पुर्नप्रशिक्षण देण्यासाठी तसेच त्यांच्या रोजगाराच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अ‍ॅड. आशिष शेलार :** (१) शासनाने प्रशासनातील कार्यक्षमता, पारदर्शकता, निर्णयप्रक्रियेची गती आणि नागरिकभिमुख सेवा वितरण सुधारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबिले आहे.

• सदर धोरणानुसार विविध शासकीय विभागांमध्ये नागरिक सेवा वितरण, तक्रार निवारण, दस्तऐवज व्यवस्थापन, डेटा विश्लेषण, निर्णय साहाय्य, अनुपालन (Compliance) व इतर प्रशासकीय कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी AI आधारित उपाययोजनांचा अभ्यास व टप्प्याटप्प्याने अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. प्रत्येक शासकीय विभागाने किमान एक AI प्रकल्प कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट आहे.

(२) व (३) AI तंत्रज्ञानाचा वापर हा शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची जागा घेण्यासाठी नसून त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करून अधिक गुणवत्तापूर्ण व जलद सेवा प्रदान करण्यासाठी सहाय्यक साधन (Assistive Technology) म्हणून करण्यात येत असून बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत राहण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्षमता वृद्धीसाठी (Capacity Building), पुनर्कौशल्य (Reskilling), कौशल्यविकास (Upskilling), प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम शासनामार्फत राबविण्यात येणार आहेत.

भविष्यात AI आधारित प्रणालीची अंमलबजावणी करताना संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे AI तंत्रज्ञानाचा अवलंब हा रोजगार कमी करण्यासाठी नसून प्रशासन अधिक सक्षम, कार्यक्षम व नागरिककेंद्रित करण्यासाठी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील कर्जत-चारफाटा परिसरातील वाहतुकी कोंडी दूर करण्याबाबत

**(१४) * ९६९१ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत-चारफाटा परिसरात वाहतुकीची कोंडी दिवसेंदिवस गंभीर होत असून सदर मार्गावर सुमारे ४ ते ५ कि.मी.पर्यंत वाहनांच्या रांगा लागून २ ते ३ तास वाहतूक कोंडी होत असल्यामुळे रुग्णवाहिका, गरोदर महिला तसेच सर्वसामान्य प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळविण्यासाठी काही महिन्यांपूर्वी संबंधित ठिकाणी बसविण्यात आलेले वाहतूक सिग्नल अद्यापही कार्यान्वित नसल्याने तसेच अरुंद रेल्वे पूल, वाहतूक पोलिसांच्या नियोजनाचा अभाव व बेशिस्त वाहनचालक यांमुळे वाहतूक समस्या अधिक गंभीर होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समस्या कायमस्वरूपी सोडविण्याच्या दृष्टीने कर्जत-चारफाटा येथील रेल्वे पुलाचे रुंदीकरण करणे, वाहतूक व्यवस्थापनासाठी अतिरिक्त पोलीस बळ उपलब्ध करून देणे, सिग्नल यंत्रणा तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत तसेच भविष्यातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्ग, वाहतूक नियोजन व पायाभूत सुविधा विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ३०/०४/२०२६ रोजी कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील चौकफाटा ते श्रीराम पूल, कर्जत येथे दोन्ही लेनवर रस्त्याचे कॉक्रिटीकरणाचे काम सुरु असल्याने सदर ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती. तथापि, सदर वाहतूक कोंडी तात्काळ सुरळीत करण्यात आलेली आहे.
(२) व (३) सदर ठिकाणी वाहतूक सिग्नल यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सद्य:स्थितीत दोन्ही लेनवर टप्याटप्याने चालू असल्याने सदरची सिग्नल यंत्रणा तात्पुरत्या स्वरुपात बंद ठेवण्यात आलेली आहे.

• तसेच, सदर ठिकाणी रेल्वे पूल अंरुद असल्याने त्यावरुन केवळ एकेरी वाहतूक करणे गरजेचे असल्याने त्याप्रमाणे वाहतूकीचे नियोजन करण्यात येते.

• या ठिकाणी वाहतूकीच्या नियमनासाठी जिल्हा वाहतूक शाखेकडील १ पोलीस उप निरीक्षक आणि ५ पोलीस अमंलदार तसेच आवश्यकतेनुसार कर्जत पोलीस ठाणे कडून पोलीस अधिकारी व अमंलदार नेमले जातात. तसेच सार्वजनिक सुट्टया आणि विकेंड दरम्यान अधिकचे अतिरिक्त पोलीस बळ सदर ठिकाणी उपलब्ध करुन दिले जाते.

• त्याचप्रमाणे विकेंडला या ठिकाणी वाढणारी वाहन संख्या पाहता वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-ए मुरबाड-कर्जत-खोपोली या मार्गावर प्रत्येक आठवड्याचे शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तीन दिवसांमध्ये कर्जत शहर हद्दीमध्ये सकाळी ०६.०० वाजता ते रात्री २३.०० वा.पर्यंतच्या कालावधीत, अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्याबाबत जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वये वाहतूक बंदी अधिसूचना लागू करण्यात आलेली असून याबाबतची अमंलबजावणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरूर (पुणे) तालुक्यातील शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मटका व जुगार व्यवसाय सुरू असल्याबाबत

**(१५)** * **१०२८५ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्रापूर (ता.शिरूर, जि.पुणे) येथील पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये पोलीस चौकी जवळ सुरू असलेल्या मटका व्यवसायावर स्थानिक पोलिसांऐवजी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने कारवाई केली असल्याने स्थानिक पोलिसांच्या कार्यक्षमतेवर नागरिकांमध्ये संशय निर्माण झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरात पोलिसांच्या कथित वरदहस्तामुळे अथवा बेकायदेशीर आर्थिक हितसंबंधांमुळे मटका व जुगार व्यवसायांना अभय मिळत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कर्तव्यात कसुर करणाऱ्या किंवा दोषी आढळणाऱ्या संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) माहे एप्रिल, २०२६ मध्ये शिक्रापूर पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे कोरेगाव भीमा (ता.शिरूर, जि.पुणे) येथे मटका व्यवसायावर करण्यात आलेली कारवाई ही शिक्रापूर पोलीस स्टेशन आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, पुणे ग्रामीण यांच्या संयुक्त पथकाद्वारे करण्यात आली आहे. सदर मोहिमेत शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस अंमलदार यांनी एकत्रित सहभाग घेऊन एकूण तीन छापे टाकले आहेत. माहे एप्रिल, २०२६ मधील संयुक्त कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे :

१) गु.र.क्र. ३६७/२०२६: सदर गुन्हा महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५ अंतर्गत दिनांक २५/०४/२०२६ रोजी दाखल करण्यात आला असून, यामध्ये ४ आरोपींना नोटीस देण्यात आली आहे.

२) गु.र.क्र. ३१६/२०२६: सदर गुन्हा महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५ अंतर्गत दिनांक १५/०४/२०२६ रोजी दाखल करण्यात आला असून, यामध्ये ७ आरोपींना नोटीस देण्यात आली आहे.

३) गु.र.क्र ३०५/२०२६: सदर गुन्हा महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अंतर्गत दिनांक ११/०४/२०२६ रोजी दाखल करण्यात आला असून, यामध्ये १२ आरोपींना नोटीस देण्यात आली आहे.

तसेच शिक्रापुर पोलीस पथकाने एक स्वतंत्र कारवाई करुन दिनांक ०३/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये गु.र.क्र २७७/२०२६ नोंदविला आहे.

(२) व (३) शिक्रापूर पोलीस ठाणे हद्दीत मागील ३ वर्षांत जुगार प्रतिबंधक मोहिमे अंतर्गत सन २०२४ मध्ये ३८ गुन्हे दाखल करून ५१,३७,९४५/- रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला व ५७ आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली; तसेच सन २०२५ मध्ये ५२ गुन्हे दाखल करून ७,४६,४१०/- रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला व १०३ आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली; तर सन २०२६ मे अखेरपर्यंत १३ गुन्हे दाखल करून ६,३७,२९०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून ५३ आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या दिनांक १९/०६/२०२६ रोजीच्या अहवालानुसार शिक्रापुर पोलीसांच्या वरदहस्तामुळे अथवा बेकायदेशीर आर्थिक हितसंबंधांमुळे मटका व जुगार अड्यांना अभय मिळत असल्याच्या तक्रारी प्राप्त नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सीमावर्ती भागात अवैधरित्या शस्त्र निर्मिती व तस्करी होत असल्याबाबत

**(१६)** * **९७८८ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पालगतच्या परिसरात करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान एक आंतरराज्यीय शस्त्र तस्करी करणारी टोळी आढळून आली असून, तेथून काही अग्निशस्त्रे व संबंधित साहित्य जप्त करण्यात आले आहेत तसेच सीमावर्ती भागातील काही ठिकाणी पारंपरिक व्यवसायासोबत अवैध अग्निशस्त्र निर्मिती होत असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाच्या तपासात सीमावर्ती भागातून आंतरराज्यीय गुन्हेगारी साखळी, अवैध शस्त्र पुरवठा व संघटीत तस्करीशी संबंधित पुरावा आढळून आल्यामुळे राज्याच्या अंतर्गत व सीमावर्ती सुरक्षिततेच्या दृष्टीने संवेदनशील परिस्थिती निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मेळघाट परिसर व लगतच्या सीमावर्ती भागांचा वापर अवैध शस्त्र वाहतूक अथवा तस्करीसाठी होऊ नये यासाठी राज्य पोलीस, स्थानिक प्रशासन व संबंधित यंत्रणांमार्फत प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याबाबत तसेच महाराष्ट्र–मध्यप्रदेश आंतरराज्यीय सीमांवर अधिक प्रभावी तपासणी, संयुक्त मोहिमा, नाकाबंदी, माहितीची देवाणघेवाण करण्याबाबत व सदर प्रकरणातील संबंधित संशयितांविरुध्द कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अमरावतीमधील मेळघाट विभागात अवैध अग्निशस्त्रांबाबत माहे मे, २०२६ मध्ये अशी घटना निदर्शनास आलेली नाही. तथापि, अमरावती ग्रामीण पोलीसांमार्फत मेळघाट परिसर व लगतच्या सीमावर्ती भागात अवैध शस्त्र वाहतूक अथवा तस्करीच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्र- मध्यप्रदेश आंतरराज्यीय सीमावर्ती भागात अधिक प्रभावी तपासणी करणे, संयुक्त मोहिमा राबवणे तसेच नाकाबंदी करणे अशा प्रकारे योग्य ती खबरदारी घेतली जाते.

महाराष्ट्र- मध्यप्रदेश आंतरराज्यीय सीमावर्ती भागात महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्याचे वरीष्ठ पोलीस अधिकारी यांची सभा घेण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सीमालगत होणारी अवैध शस्त्र वाहतूक व तस्करी रोखण्याबाबत विशेष पथकाची नेमणूक करण्याबाबत सूचीत करण्यात आलेले आहे. तसेच अवैध शस्त्र वाहतूक व तस्करी रोखण्याच्या अनुषंगाने पोलीसांमार्फत नियमित रात्र-गस्त व नाकाबंदी यांमार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत अवैधरित्या शस्त्र निर्मिती व तस्करी मोठ्या प्रमाणात होत असल्याबाबत

**(१७)** * **१००७४ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात राजकीय व्यक्ती, सिनेकलावंत, दिग्दर्शक तसेच इतर अन्य व्यावसायिकांसह सामान्य नागरिकांवर असामाजिक व्यक्तीकडून गंभीर प्रकारचे हल्ले होत असून त्यात रिव्हॉल्वर व चॉपर आणि अन्य हत्यारांचा वापर करण्यात येत असून अवैध शस्त्रांची तस्करी तसेच निर्मिती मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून त्यावर शासनाचे नियंत्रण नसल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई पोलिसांनी विविध कारवायांद्वारे ६०० हून अधिक देशी व विदेशी बनावटीची अवैध शस्त्रे जप्त केली असून पोलिसांनी केलेल्या कारवायानंतरही अवैध शस्त्रांची उपलब्धता कायम असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात सुरू असलेल्या अवैध शस्त्र तस्करीस प्रतिबंध घालून अवैध शस्त्र तस्करी रोखण्याकरीता तसेच बेकायदेशीर शस्त्रांची निर्मिती रोखून त्यावर आळा घालण्यासाठी संबंधित गुन्हेगारांविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मुंबई शहरामध्ये सन २०२५ मध्ये ज्या गुन्ह्यांमध्ये अग्निशस्त्रांचा वापर झाला अशा गुन्ह्यांची संख्या ३८ होती व सर्व गुन्हे उघड होऊन यामध्ये ६२ आरोपींना अटक करण्यात आले असून ५९ अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. सन २०२६ मध्ये १८ गुन्ह्यांची नोंद झाली असून सर्व गुन्हे उघड झाले आहेत व या गुन्ह्यांमध्ये ५८ आरोपींना अटक करण्यात आले असून २८ अग्निशस्त्रे जप्त करण्यात आलेली आहेत.

तर, सन २०२५-२६ व २०२६-२७ या कालावधीमध्ये भारतीय हत्यार कायद्यान्वये आतापर्यंत एकूण १६० गुन्हे दाखल असून १५९ गुन्हे उघड झालेले असून २०१ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व १९८ अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. मुंबई पोलीसांनी अवैध शस्त्रांसंदर्भातील सर्व गुन्हयामध्ये योग्य ती कायदेशीर कारवाई केली आहे.

तथापि, मुंबई शहरामध्ये अवैध शस्त्र निर्मितीबाबत कोणतीही घटना/गुन्हा दाखल नाही. मुंबई पोलीसांनी अवैध तस्करी करणाऱ्या संबंधित गुन्हेगारांविरूध्द मोका कायद्यांतर्गत कठोर कारवाई केली आहे. तसेच मुंबई पोलीसांमार्फत नियमित गस्त व आवश्यक माहिती संकलीत करून प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जामनेर पुरा (जि.जळगाव) येथील व्यक्तीने सावकारी जाचास कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

**(१८) * १०२०० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामनेर पुरा (जि.जळगाव) येथे अवैध सावकारी जाचाला कंटाळून एका व्यक्तीने आत्महत्या केली असल्याची बाब दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मुख्य दोषी असलेल्या सावकारास स्थानिक पोलीस प्रशासनाचे अभय असल्यामुळे त्याला अटक करण्यास पोलीस जाणीवपूर्वक टाळाटाळ करित असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने मुख्य दोषी आरोपीस पोलीसांनी संरक्षण दिल्याप्रकरणी संबंधितांची चौकशी करुन पीडीत कुटुंबाला न्याय देण्यासाठी आणि आरोपीस तात्काळ अटक करून त्याच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १७/०२/२०२६ रोजी घडलेल्या घटनेतील आरोपीने आत्महत्या केलेल्या व्यक्तीस सोलर बसविण्याचे काम दिले होते व त्या कामाचे पैसेही दिले होते. परंतु सोलर बसविण्यास उशीर होत असल्याने काम पूर्ण करून देण्याबाबत आरोपी तगादा लावत होता व काम पूर्ण होत नसल्याने दिलेले पैसे परत मागत होता, असे गुन्ह्याच्या तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे सावकारी जाचाला कंटाळून ही आत्महत्या केली, अशी वस्तुस्थिती नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीसांनी आरोपीस कोणत्याही प्रकारचे संरक्षण व अभय दिलेले नाही. आरोपीवर जामनेर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८१/२०२६ भा.न्या.सं.कं १०८ प्रमाणे दिनांक ०१/०३/२०२६ रोजी १९.५३ वा. गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला मा.जिल्हा सत्र न्यायालय, जळगाव यांनी दिनांक २४/०३/२०२६ रोजी अटकपूर्व जामिन मंजूर केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.